# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/16/बातमी/ईमेल/2020 दिनांक:- 5 मार्च, 2020

जळगांव दि.5 ( ):- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या खेळाडूंनी के.आय.आय.टी. भुवनेश्वर, (ओरिसा) येथे नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया विद्यापीठ भारोत्तोलन (पुरुष/महिला) स्पर्धेत सुवर्ण, रौप्य व कास्य पदक पटकावले.

५५ किलो ग्रॅम वजन गटात धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूरचा प्रशांत कोळी या खेळाडूने ११० किलो ग्रॅम स्नॅच आणि १३३ किलो ग्रॅम क्लिन एण्ड जर्क असे एकूण २४३ किलो ग्रॅम वजन उचलले व ११० किलो ग्रॅम स्नॅच उचलून राष्ट्रीय रेकॉर्ड आपल्या नावे केला आणि द्वितीय क्रमांक मिळवून रौप्य पदक प्राप्त केले.

६१ किलो ग्रॅम वजन गटात व्ही.एस. नाईक महाविद्यालय, रावेर चा गोविंदा महाजन या खेळाडूने १०४ किलो ग्रॅम स्नॅच आणि १३० किलो ग्रॅम क्लिन एण्ड जर्क असे एकूण २३४ किलो ग्रॅम वजन उचलले आणि प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक प्राप्त केले.

४५ किलो ग्रॅम वजन गटात धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूरची प्रेरणा सोनवणे या खेळाडूने ५६ किलो ग्रॅम स्नॅच आणि ७० किलो ग्रॅम क्लिन एण्ड जर्क असे एकूण १२६ किलो वजन उचलले आणि तृतीय क्रमांक मिळवून कांस्य पदक प्राप्त केले. डिसेंबर महिन्यात चंदीगढ विद्यापीठ, मोहाली येथे झालेल्या अखिल भारतीय भारोत्तोलन स्पर्धेत या खेळाडूंनी पदक प्राप्त केल्यामुळे खेलो इंडिया मध्ये त्यांची निवड झाली होती.

खेळाडूंच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. पी.पी. पाटील यांचे हस्ते खेळाडूंचा तसेच प्रशिक्षक डॉ. गोविंद मारतळे, डॉ. मुकेश पवार, प्राचार्य, डॉ. पी.आर. चौधरी धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर तसेच प्राचार्य, डॉ. परेश दलाल व्ही.एस. नाईक महाविद्यालय, रावेर तसेच प्रा. उमेश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप रामू पाटील, विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. बी.व्ही. पवार तसेच सहसंचालक डॉ. सतिष देशपांडे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील उपस्थित होते.

----------------

## बातमी क्र.2

जळगांव दि.५ ( ):- बदलत्या जीवनशैलीचा परिणाम महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत असून त्यावर मात करत मन सकारात्मक ठेवण्यासाठी महिलांनी दररोज योगा करावा असे आवाहन योगा विषयाच्या अभ्यासक डॉ.लिना चौधरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील मनस्विनी महिला समुहाकडून गुरुवार दि.५ मार्च रोजी महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर डॉ.चौधरी यांचे विद्यापीठात व्याख्यान झाले. “महिला सक्षमीकरण, महिलांचा विकास आरोग्य ताणतणाव व योगा ” या विषयावर त्या बोलत होत्या. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार, प्रा.अर्चना देगावकर, प्रा.संजीवनी भालसिंग उपस्थित होते.

डॉ.लिना चौधरी म्हणाल्या की, आजार हे शारीरिक सोबत मानसिक देखील आहेत. वयाच्या पस्तीशीनंतर महिलांमध्ये हार्मोनल बदल होत असतात. त्यातून थायरॉईड, डायबिटीस, ब्लडप्रेशर हे आजार सुरु होतात. महिलांनी दररोज कोमट पाणी आणि एक चमचा गायीचे तूप तसेच दूध घेणे आवश्यक आहे. यातून शारीरिक झीज भरुन निघते. दररोज योगा केले तर आयुष्य आनंदाने जगता येते. षडरिपूंवर मात करता येते. योगामुळे राग

आणि क्रोधावर नियंत्रण प्राप्त होते असे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी महिलांना विविध योगासनांची माहिती दिली. प्रास्ताविक व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली शर्मा यांनी केले. मृणालिनी चव्हाण यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

-----------------------

बातमी क्र.3

जळगाव दि. (           ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रासायनिक तंत्रज्ञान संस्थेत आयोजित ओपन हाऊस कार्यक्रमाचा निरोप समारंभ प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक प्रा.जे.बी.नाईक होते. समन्वयक प्रा.जी.ए.उस्मानी यांनी प्रास्ताविक केले. या ओपन हाऊसमध्ये झालेल्या व्यक्तिमत्व व फॅशन परेड स्पर्धेसाठी जपान येथे असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी प्रायोजक म्हणून मदत केली. प्रा.एम.आय.तालिब यांनी आभार मानले. प्रा.माहुलीकर यांच्याहस्ते ओपन हाऊस मध्ये झालेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

---------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.कबचौउमवि/16/बातमी/ईमेल/2020 दिनांक 5 मार्च, 2020

मा.संपादक,

दैनिक -------------------

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून विनामूल्य प्रसिध्दीस देऊन सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू,<br>(डॉ. सुनील पाटील)<br>जनसंपर्क अधिकारी